भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# लोक भविष्य निधी अधिनियम, १९६८

(१९६८ चा अधिनियम क्रमांक २३)

[२८ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Public Provident Fund Act, 1968

**(Act No. 23 of 1968)**

[As in force on the 28th February 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९६
[किंमत : रु.        ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २८ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला पब्लीक प्रॉव्हीडंट फंड ॲक्ट, १९६८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड, ६, अंक २, दिनांक २३ नोव्हेंबर १९९५ यात पृष्ठ ७५ ते ७७ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २३ नोव्हेंबर १९९५.

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Public Provident Fund Act, 1968 as on the 28th February 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 6, dated 23rd November 1995 on pages 75 to 77.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (a) of the Authoritative Text (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Date 23rd November 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# लोक भविष्य निधि अधिनियम, १९६८

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. लोक भविष्य निधि योजना.

४. निधीत वर्गणी भरणे.

५. व्याज.

६. रकम काढून घेणे.

७. कर्जे देणे.

८. वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर प्रदान करणे.

९. जप्तीपासून संरक्षण.

१०. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

११. अडचणी दूर करण्याची शक्ती.

१२. योजना संसदेपुढे ठेवणे.

अनुसूची.

शब्दसूची :—मराठी-इंग्रजी

इंग्रजी-मराठी

एच ४२३४—२ (१,०२६-६-९६)

# लोक भविष्य निधि अधिनियम, १९६८

## (सन १९६८ चा अधिनियम क्रमांक २३)

(दिनांक २८ फेब्रुवारी १९९५ रोजी यथाविद्यमान)

(१६ मे, १९६८)

**सर्वसाधारण जनतेसाठी भविष्य निधी स्थापन करण्याचा उपबंध करण्याबाबत अधिनियम**

भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी संसदेकडून याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :— संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमास "लोक भविष्य निधि अधिनियम, १९६८" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतावर राहील.

२. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(क) "निधि" या शब्दाचा अर्थ, योजनेखाली प्रस्थापित केलेला लोक भविष्य निधी असा आहे;

(ख) "अज्ञात व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ, "भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५" अन्वये जी व्यक्ती सज्ञान झाली असल्याचे मानण्यात येत नाही अशी व्यक्ती असा आहे;

(ग) "योजना" शब्दाचा अर्थ, कलम ३–पोटकलम (१) अन्वये तयार करण्यात आलेली लोक भविष्य निधि योजना असा आहे;

(घ) "वर्गणीदार" या शब्दाचा अर्थ, कलम ४ अन्वये निधीत वर्गणी भरणारा माणूस आणि एखादा माणूस, तो ज्या अज्ञान व्यक्तीचा पालक आहे त्या अज्ञान व्यक्तीच्या वतीने अशी वर्गणी भरत असेल तर त्या बाबतीत, ती अज्ञान व्यक्ती असा आहे;

(ङ) "वर्ष" या शब्दाचा अर्थ वित्तीय वर्ष असा आहे.

३. (१) सर्वसाधारण जनतेसाठी एखादा भविष्य निधी प्रस्थापित करण्याकरिता, केंद्र सरकारास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, "लोक भविष्य निधि, योजना" या नावाची एक योजना तयार करता येईल, आणि अशी योजना तयार करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, या अधिनियमाच्या व अशा योजनेच्या उपबंधांनुसार एक निधी प्रस्थापित करण्यात येईल. लोक भविष्य निधि योजना.

(२) या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी अशा योजनेद्वारे तरतूद करता येईल.

(३) हा अधिनियम खेरीजकरून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा हा अधिनियम खेरीजकरून अन्य कोणत्याही कायद्याच्या आधारे परिणामक्षम असलेल्या कोणत्याही संलेखात काहीही अंतर्भूत असले तरीही, अशी योजना परिणामक्षम असेल.

(४) केंद्र सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा योजनेत वेळोवेळी जादा उपबंधांची भर घालता येईल, अशी योजना विशोधित करता येईल किंवा तीत बदल करता येतील.

४. कोणत्याही माणसास आपल्या स्वतःच्या वतीने किंवा तो ज्या अज्ञान व्यक्तीचा पालक आहे त्या अज्ञान व्यक्तीच्या वतीने अशा निधीत, अशा योजनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कमाल व किमान मर्यादांनुसार वर्गणी भरता येईल. निधीत वर्गणी भरणे.

५. कलम ४ अन्वये भरण्यात आलेल्या सर्व वर्गण्यांवर, केंद्र सरकार शासकीय राजपत्रात वेळोवेळी अधिसूचित करील अशा दराने व्याज देय होईल, आणि योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या रीतीने अशा व्याजाचा हिशेब करण्यात येईल. व्याज.

६. (१) वर्गणीदारास आपल्या नावे निधीत जमा असलेल्या रकमेतून (अशा रकमेवर उपार्जित झालेल्या कोणत्याही व्याजाच्या रकमेसह) योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत व विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने कोणत्याही रकमा काढून घेण्याचा हक्क असेल : रक्कम काढून घेणे.

परंतु, ज्या वर्षी त्या निधीत प्रथम वर्गणी भरली असेल त्या वर्षाच्या अखेरीपासून पाच वर्षांचा कालावधी संपल्यानंतरच केवळ अशा रकमा काढण्यास परवानगी देण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, वर्गणीदारास, त्याने निधीत ज्या वर्षी प्रथम वर्गणी भरली असेल त्या वर्षाच्या अखेरीपासून पंधरा वर्षांचा कालावधी संपल्यानंतर, निधीत त्यांच्या नावे जमा असलेली संपूर्ण शिल्लक रक्कम काढून घेण्याचा हक्क असेल.

(३) पोटकलमे (१) व (२) यांतील उपबंधांच्या अधीनतेने, एखाद्या माणसाने, तो ज्या अज्ञान व्यक्तीचा पालक आहे, त्या अज्ञान व्यक्तीच्या वतीने निधीत वर्गण्या भरल्या असतील तर, केवळ अज्ञान व्यक्तींच्या उपयोगासाठीच त्यास निधीतून कोणतीही रक्कम काढून घेण्याचा हक्क असेल.

कर्ज देणे. ७. एखाद्या वर्गणीदाराच्या नावे व निधीत जमा असलेल्या रकमेतून त्या वर्गणीदारास योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या अटींवर व शर्तींवर कर्जे मंजूर केली जाऊ शकतील. आणि वर्गणीदार अज्ञान असेल तर, केवळ अज्ञान व्यक्तीच्या उपयोगासाठीच अशी कर्जे त्यांच्या पालकास देण्यात येतील.

वर्गणीदाराच्या मृत्यूनंतर प्रदान करणे. ८. (१) एखाद्या वर्गणीदाराचा मृत्यू घडून आला असेल आणि त्याने कोणत्याही व्यक्तीच्या नावाने केलेले एखादे नामनिर्देशन त्याच्या मृत्यूच्या वेळी अंमलात असेल तर अशा बाबतीत, त्या वर्गणीदाराच्या नावे निधीत जमा असलेल्या सर्व रकमा अशा नामनिर्देशित व्यक्तीस प्रदेय होतील.

(२) अशी नामनिर्देशित व्यक्ती अज्ञान असेल तर, अशा अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीच्या संबंधात सक्षम न्यायालयाने नियुक्त केलेल्या कोणत्याही पालकास पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमा प्रदेय होतील, किंवा अशा रीतीने कोणताही पालक नियुक्त करण्यात आला नसेल तर, अज्ञान व्यक्तीच्या आईवडिलांपैकी कोणाही एकास, किंवा अशा आईवडिलांपैकी कोणीही हयात नसेल तर, त्या अज्ञान व्यक्तीच्या अन्य कोणत्याही पालकास त्या रकमा प्रदेय होतील.

(३) वर्गणीदाराच्या मृत्यूच्या वेळी कोणतेही नामनिर्देशन अंमलात नसेल तर, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमा त्याच्या कायदेशीर वारसांना प्रदेय होतील.

जप्तीपासून संरक्षण. ९. कोणत्याही वर्गणीदाराच्या नावे निधीत जमा असलेली रक्कम ही, त्या वर्गणीदाराला झालेल्या कोणत्याही ऋणाच्या किंवा आलेल्या कोणत्याही दायित्वाच्या संबंधात कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याअन्वये किंवा आदेशाअन्वये जप्त होण्यास पात्र ठरणार नाही.

सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण. १०. या अधिनियमान्वये किंवा योजनेन्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही चालणार नाही.

अडचणी दूर करण्याची शक्ती. ११. (१) या अधिनियमाच्या किंवा योजनेच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, केंद्र सरकारास अशी अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे आणि तसेच या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील ते उपबंध शासकीय राजपत्रात आदेश प्रकाशित करून, करता येतील :

परंतु, असा कोणताही आदेश या अधिनियमाच्या प्रारंभापासून तीन वर्षे संपल्यानंतर काढता येणार नाही.

(२) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

योजना संसदेपुढे ठेवणे. १२. योजना तयार करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, ती संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे याचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठ येणाऱ्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीसाठी ठेवण्यात आली पाहिजे, आणि ज्या अधिवेशनात ती योजना अशा रीतीने ठेवण्यात आली असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी अशा योजनेच्या कोणत्याही उपबंधात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, त्या योजनेचे उपबंध त्यानंतर केवळ अशा रीतीने फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येतील किंवा अशा योजनेतील कोणताही उपबंध करण्यात येऊ नये म्हणून, दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो उपबंध अंमलात येणार नाही. तथापि, अशा उपबंधात अशा रीतीने फेरबदल केल्यामुळे किंवा असा उपबंध रद्द केल्यामुळे त्या उपबंधाखाली पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

[कलम ३(२) पहा]

ज्या बाबींसाठी योजनेत तरतूद करावयाची त्या बाबी :—

(१) निधीत कशा रीतीने वर्गणी भरता येईल ते व अशा वर्गण्यांच्या कमाल व किमान मर्यादा.

(२) निधीतील वर्गण्यांवर द्यावयाच्या व्याजाचा हिशेब कशा रीतीने करण्यात येईल.

(३) वर्गणीदारांनी निधीत भरलेल्या वर्गण्यांच्या पुराव्यादाखल त्यांना द्यावयाचे दस्तऐवज.

(४) वर्गणीदारांच्या नावे निधीत जमा असलेल्या रक्कमेतून त्यांना किती मर्यादेपर्यंत आणि कोणत्या अटींवर व शर्तींवर निधीतील रकमा काढता येतील.

(५) ज्यांना निधीतील वर्गण्या वसूल करता येतील किंवा ज्यांच्या मार्फत निधीतील रकमा काढता येतील असे प्राधिकरण किंवा प्राधिकरणे कोणती असतील.

(६) वर्गणीदारांना त्यांच्या नावे निधीत जमा असलेल्या रकमांतून कोणत्या अटींवर व शर्तींवर कर्जे मंजूर करता येतील आणि कोणते प्राधिकरण किंवा कोणती प्राधिकरणे अशी कर्जे मंजूर करू शकतील.

(७) निधीतील वर्गण्या त्यातून काढलेल्या रकमा व त्यांच्या संबंधात केलेली अंतिम प्रदाने, तसेच, त्यातून मंजूर करण्यात आलेली कर्जे, यासंबंधी ठेवावयाचे हिशेब आणि असे हिशेब कोणत्या प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणांनी ठेवावयाचे.

(८) एखाद्या वर्गणीदाराचा मृत्यू घडून आल्यास त्याच्या नावे निधीत जमा असलेली रक्कम मिळण्याकरिता एखाद्या व्यक्तीस नामनिर्देशित करणे आणि असे नामनिर्देशन रद्द करणे किंवा त्यात बदल करणे.

(९) निधीत कोणतीही वर्गणी भरल्याबद्दलचा पुरावा म्हणून देण्यात आलेला कोणताही मूळ दस्तऐवज खराब झाल्यास, हरवल्यास किंवा नष्ट झाल्यास त्याची दुसरी प्रत देणे व अशी दुसरी प्रत मिळण्यासाठी द्यावयाची फी.

(१०) योजनेत तरतूद करावयाची अथवा योजना कार्यान्वित करण्याच्या प्रयोजनासाठी जी आवश्यक आहे किंवा योग्य आहे अशी इतर कोणतीही बाब.

# लोक भविष्य निधि अधिनियम, १९६८

# THE PUBLIC PROVIDENT FUND ACT, 1968

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| ऋण | debt | .. [क. ९] |
| कर्ज | loan | .. [क. ७] |
| प्रदान | payment | .. [अनुसूची (७)] |
| माणूस | individual | .. [क. २ (घ)] |
| योजना | Scheme | .. [क. २ (ग)] |
| लोक भविष्य निधि | Public Provident Fund | .. [शीर्षक] |
| लोक भविष्य निधि योजना | Public Provident Fund Scheme | .. [क. २ (ग)] |
| वर्गणीदार | subscriber | .. [क. २ (घ)] |
| व्यक्ती | person | .. [क. २ (ख)] |

---

# THE PUBLIC PROVIDENT FUND ACT, 1968

# लोक भविष्य निधि अधिनियम, १९६८

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| debt | ऋण | .. [S. 9] |
| individual | माणूस | .. [S. 2 (*d*)] |
| loan | कर्ज | .. [S. 7] |
| payment | प्रदान | .. [Schedule (7)] |
| person | व्यक्ती | .. [S. 2 (*b*)] |
| Public Provident Fund | लोक भविष्य निधि | .. [Title] |
| Public Provident Fund Scheme | लोक भविष्य निधि योजना | .. [S. 2 (*c*)] |
| Scheme | योजना | .. [S. 2 (*c*)] |
| subscriber | वर्गणीदार | .. [S. 2 (*d*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई